# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)**

**दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५**

**दूरध्वनी क्र :- २८४९७५०४**

## ५४ व्या गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव फिल्म बाजार - २०२३ मध्ये सहभागाकरिता अटी व शर्ती :-

१. सदर जाहिरातीचा कालावधी दिनांक दि.२४/०८/२०२३ ते ०८/०९/२०२३ असा आहे.

२. निर्माते / निर्मिती संस्थांनी त्यांचे प्रस्ताव gfffm2023@gmail.com या ई-मेल वर सादर करावेत.

३. दिनांक ०१/०८/२०२२ ते ३१/७/२०२३ या कालावधीत भारतीय सेन्सॉर बोर्डामार्फत सेन्सॉर प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या मराठी चित्रपटांचा समावेश असेल.

४. चित्रपटाची लांबी कमीत कमी ९० मिनिटे असावी (फिचर फिल्म)

५. इतर भाषेतील रिमेक, डब किंवा सबटायटल असलेल्या मराठी चित्रपटांना सहभागी होता येणार नाही.

६. ज्या चित्रपटांची कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव फिल्म बाजार - २०२३ करिता महामंडळामार्फत निवड करण्यात आली होती अशा चित्रपटांना सहभागी होता येणार नाही.

७. महामंडळाकडे प्राप्त होणाऱ्या चित्रपटांच्या प्रस्तावामधून परीक्षण समितीने निवड केलेल्या जास्तीत जास्त १० चित्रपटांची निवड करण्यात येईल.

८. चित्रपटाची निवड गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव फिल्म बाजार - २०२३ करिता झाल्यास वेळोवेळी चित्रपटाची डिसीपी व केडीएम आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्याची जबाबदारी निर्माते / निर्मिती संस्थेची राहील.

९. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्र.०२२-२८४९७५०४ तसेच भ्रमणध्वनी क्र. ९८१९६३८२२१ (श्री.मंगेश राऊळ) आणि ९७०२२७०८२१ (श्री.पंकज चव्हाण) या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

१०. कोणत्याही वेळी जाहिरात रद्द करण्याचे अथवा जाहिरातीमध्ये बदल करण्याचे सर्वाधिकार महामंडळ राखुन ठेवत आहे.

--------